# हवामान आधारीत कृषि सल्ला

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, इगतपुरी,

## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com


**६६) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १६.१०.२०२०**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (०९/१०/२०२० ते १५/१०/२०२०) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१७/१०/२०२० ते २१/१०/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | दिनांक | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| ०.० | ७.० | ०.० | ०.० | ०.० | ४.६ | २३.० | पाऊस (मिमी) | २० | २४ | २३ | १६ | १५ |
| ३०.६ | ३१.४ | ३१.२ | २९.० | ३१.६ | ३१.६ | ३०.० | कमाल तापमान (अं.से.) | ३० | ३१ | ३२ | ३१ | ३१ |
| १९.६ | २१.६ | २३.० | २२.६ | २१.४ | २२.० | २२.४ | किमान तापमान (अं.से.) | २३ | २४ | २४ | २४ | २४ |
| ढगाळ | ढगाळ | ढगाळ | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| १०० | ९२ | ९३ | ७१ | ६३ | ८९ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ९१ | ९२ | ९४ | ९५ | ९३ |
| ६५ | ६७ | ६४ | ७४ | ५५ | ७८ | ७७ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६६ | ६६ | ६६ | ७३ | ७१ |
| ३.१ | ३.९ | २.० | १.७ | २.१ | २.८ | ५.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ४ | ६ | ६ | ५ | ७ |

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला**

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | **पुढील पाच दिवस आकाश ढगाळ राहील तसेच काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.** |
| सामान्य सल्ला | | १.पिकांमध्ये पाणी साचून राहणार नाही याची दक्षता घ्यावी आणि साचलेल्या पाण्याचा निचरा करावा.<br>२. जोराच्या वारा व पाऊसापासून होणाऱ्या संभाव्य नुकसान टाळण्याकरीता उपायोजना कराव्यात.<br>३. जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधावीत.<br>४. विजेचा पूर्वानुमानाकरीता दामिनी मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>५.. पडणा-या पावसाचे पाणी शेतात साठवण्यासाठी उपाय योजना करावी.<br>६. शेतीचे कामे करताना कामगाराना ४ ते ५ फुटाचा पट्टा वाटून दिल्यास काम पण योग्य होइल आणि योग्य सामाजिक अंतरही ठेवले जाईल. शेती यंत्रे निर्जंतुकीकरण करावीत. तोंडाला मास्क अथवा कापड गुडाळावे.<br>७. पावसाचा अंदाज घेवुनच पिकावर कीटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करावी. |
| संदेश | | **हवामानाचा भाकितानुसार भात व खरिपातील इतर पिकांची काढणी पाच दिवस पुढे ढकलावी तसेच कापणी केलेले पिक पावसात सापडल्यास वाळविण्यासाठी सुरक्षित ठिकाणी ठेवावे.** |
| भात | पुनरुत्पादक अवस्था- लोंबी वाढीची अवस्था | १) हवामानाचा भाकितानुसार भात व खरिपातील इतर पिकांची काढणी पाच दिवस पुढे ढकलावी. पावसापासून वाचविण्यासाठी या अगोदरच कापणी करण्यात आलेल्या पिकाचे ढीग वाळविणे तसेच मळणीसाठी सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करावे.<br>२) लोंबी निर्मितीच्या अवस्थतेतील भात पिकात १५ सेमी पाण्याची पातळी नियंत्रित ठेवावी.<br>३) तपकिरी तुडतुडे १५ ते २० प्रती चूड (आर्थिक नुकसानाची पातळी) आढळून आल्यास त्यांच्या नियंत्रणाकरिता बुप्रोफेजिन २५ % एससी, १००० मिली किंवा थायोमिथोक्झाम २५ विद्राव्य पावडर, १०० ग्रॅम प्रती हेक्टरी ५०० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>४) करपा, पर्ण करपा, तपकिरी ठिपके रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेडँझीम ५० % विद्राव्य पावडर, ५०० ग्रॅम प्रती हेक्टरी ५०० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. फवारणी द्रावणात स्टिकर ०.१ % (चिकटद्राव्य, १ मिली/ग्रॅम प्रती लीटर) मिसळून फवारणी करावी.<br>५) भात पिकामध्ये आभाळमय काजळी व उद्बत्ताग्रस्त लोब्यांचा नायनाट करावा. |

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल:** igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| सोयाबीन | पुनरुत्पादक अवस्था- शेंगा वाढीची | पडणाऱ्या पावसामुळे शेगांना अंकुरण्यापासून वाचविण्यासाठी निमगरवे व गरवे वाण कायिक परिपक्वता अवस्थेनंतर लवकरात लवकर काढणीस सुरवात करावी. कापणीस विलंब करू नये अन्यथा दाणेगळ होवून मोठे नुकसान होवू शकते. विळ्याने कापणी करून झाडे गोळा करून, प्रखर सूर्य प्रकाशात अथवा पावसापासून सुरक्षित जागी वाळवून, मळणीसाठी खळ्यावर ढीग करावा. |
| कापूस | पुनरुत्पादक अवस्था- फुलोरा | १) पिकावर लाल्या या कायिक बदलाची लक्षणे आढळून येत आहे. या कायिक बदलास सध्या रसशोषक किडींच्या मुख्यत्वे तुडतुडेच्या मोठ्या प्रमाणातील प्रादुर्भाव व मॅग्नेशिअम या सूक्ष्म अन्नद्रव्याच्या कमतरता या बाबी कारणीभूत आहे. त्याकरिता जमिनीद्वारे मॅग्नेशिअम सल्फेट २० ते ३० किग्रॅ प्रती हेक्टरी द्यावे आणि त्यासोबत २ % डीएपीच्या दोन फवारण्या १५ दिवसाच्या अंतराने कराव्यात<br>२) सततच्या दमट व ढगाळ वातावरणामुळे पांढरी माशीचा प्रादुर्भाव वाढण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी ट्रायझोफॉस ४० ई सी, १५०० मिली प्रती हेक्टरी ५०० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>३) पहिली वेचणी १५ ते २५ % बोंडे फुटल्यानंतर व पावसाची उघडीप असल्यासच करावी.<br>४) शेंदरी बोंड अळीचे कामगंध सापळ्यात ८ ते १० पतंग जर सतत दोन ते तीन दिवस आढळले असता ट्रायझोफॉस ४० ई सी, ३० मिली किंवा लॅम्ब्डा सायलोथ्रीन ५ % ईसी, १० मिली प्रती १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| हरभरा | | बागायती हरभरा पिकाची पेरणी २० ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर दरम्यान करावी. पेरणीकरिता देशी वाण विजय,विशाल, दिग्विजय आणि फुले विक्रम तसेच काबुली वाण विराट, पीकेव्ही-२, पीकेव्ही-४ वापरावेत. पेरणीपूर्वी एक किग्रॅ बियाण्यास २ ग्रॅम बाविस्टीन + २ ग्रॅम थायरम आणि २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणू संवर्धन गुळाच्या थंड द्रावणाद्वारे चोळून बीजप्रक्रिया करावी |
| कांदा | पुनर्लागवड | १) पुनर्लागवडीकरिता ४० ते ४५ दिवसांचे रोपे वापरावीत. जास्त कालावधीचे व अल्प कालावधीचे रोपे पुनर्लागवडीकरिता वापरू नये. लवकर रोपे स्थिर होण्यासाठी पातीचा वरील एक तृतीयांश भाग कापून टाकावा. लागवडीच्या वेळी दोन ओळींतील अंतर १५ सेमी व दोन रोपांतील अंतर १० सेमी व ठेवावे.<br>२) पुनर्लागवडीच्यावेळी शिफारशीत खत मात्रेतील ४० किग्रॅ नत्र, ४० किग्रॅ स्फुरद व ६० किग्रॅ पालाश प्रती हेक्टरी द्यावा. |
| लिंबूवर्गीय फळपिके | | फायटोपथोरा या बुरशीच्या नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा जैविक बुरशी २५ ग्रॅम प्रती झाड या प्रमाणात शेणखतामध्ये मिसळून वापरावी.<br>मोसंबी पिकामध्ये फळ काढणीपुवी येणारे देठ कुज या रोगाच्या नियंत्रणासाठी कार्बेडाझिम १ ग्रॅम प्रती लीटर या प्रमाणात घेऊन त्वरीत फवारणी करावी. |
| पशुधन व्यवस्थापन | | १) पावसाळ्यात लाळ व खुरकत आजाराचा फैलाव होण्याची दाट शक्यता असते. त्याकरिता पशुवैद्याकडून प्रतिबंधात्मक लसीकरण करून घ्यावे.<br>२)पावसाळ्यात पशुवैद्यकीय अधिकारी यांचे सल्ल्यानुसार जनावरांचे जंतनिर्मुलन करुन घ्यावे. जंतनिर्मुलनासाठी अल्बेंडाझोल किंवा ईवरमेक्टीनचा वापर करावा कारण पावसाळ्यात जंताची वाढ झपाट्याने होते |

स्त्रोत :

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

ठिकाण : विकृसंके, इगतपुरी

दिनांक : १६.१०.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**

**तथा सहयोगी संशोधन संचालक,**

**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**